महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ९८४ /२०२३ दि. ०३/११/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे शहरात सालाबादाप्रमाणे या वर्षीही दिनांक ०५/११/२०२३ ते दिनांक १५/११/२०२३ या कालावधीत **'दिपावली'** सण साजरा होणार आहे. **ठाणेनगर** वाहतूक उप विभागाच्या हद्दीत प्राचीन काळापासून मोठी बाजारपेठ आहे. सदर ठिकाणी दिपावली सणाच्या निमित्ताने मोठया प्रमाणात खरेदीसाठी लोकांची गर्दी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) जांभळी नाका कडून बाजारपेठेत जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **जांभळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जांभळी नाका येथून उजवे वळण घेवून टॉवर नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खारकर आळी कडून बाजारपेठ जांभळी नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **महाजनवाडी हॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खारकर आळी कडून येवून ठा.म.पा. व्यायाशाळा येथून महाजनवाडी हॉल लगत उजवे वळण घेवून एन.के.टी. कॉलेज कडून कोर्ट नाका मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद –** ३) ठाणे ट्रेडर्स कडून महंमद अली रोडने जांभळी नाका कडे जाणाऱ्या मोटारसायकल वगळून सर्व प्रकारच्या वाहनांना **ठाणे ट्रेडर्स** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे ट्रेडर्स कडून उजवे वळण घेवून महागिरी मशीद कडून वळुन इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) दादोजी कोंडदेव स्टेडीयम कडून बाजारपेठ कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **जवाहर बाग, अग्निशमन केंद्र** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जवाहर बाग, अग्निशामक केंद्र कडून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** अशोक सिनेमा व नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स कडून बाजारपेठेत जाणाऱ्या मोटारसायकल वगळून सर्व प्रकारच्या वाहनांना **माटे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स येथून उजवे वळण घेवून दत्त मंदिर कडून सिडको स्टॅण्ड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक ०५/११/२०२३ ते दिनांक १५/११/२०२३ रोजी पर्यंत दररोज दुपारी १३.०० ते रात्रौ २३.०० वा. पावेतो अंमलात राहील.

CS CamScanner

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुकत, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुकत, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, परिवहन ठाणे
पोलीस उपआयुक्त, परिमंडळ—१, ठाणे व विशेष शाखा, ठाणे शहर
सपोआ ठाणे वाहतुक विभाग व पोलीस निरीक्षक ठाणेनगर, राबोडी, नौपाडा वाहतुक उपविभाग

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसचुना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

CS CamScanner